महासागर
शनिवार, दि. 19 ऑक्टोंबर 2024
अमरावती
पान 3




अमरावती - अचलपुर येथे शुक्रवारी आयोजित महाराष्ट्राची हास्य जत्रा या कार्यक्रमात आमदार बच्चु कडू सामान्य माणूस म्हणून जनतेच्या मध्ये बसून कार्यक्रमाचा असा आस्वाद घेत होते.

# परपुरुषासोबत दिसल्याने पत्नीला संपविले

## आरोपी पतीला मध्यप्रदेशातून अटक | बडनेरा रेल्वे स्थानकावरील हत्येचा घटनेतील खुलासा

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** बडनेरा रेल्वेस्थानक परिसरात विवस्त्र अवस्थेत एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. महिलेची हत्या करण्यात आल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाले होते. परंतू ही हत्या कोणी केली व का केली, ही बाब उघड झाली नव्हती. याप्रकरणाचा छडा लावण्यात गुन्हे शाखेच्या युनिट 2 च्या पथकातील पोलिसांनी शुक्रवारी यश मिळाले. पत्नीला नुकतीच ओळख झालेल्या एका परपुरुषासोबत आक्षेपार्ह स्थितीत पाहिल्यानंतर पतीचा राग अनावर झाला आणि त्याने पत्नीचे केस पकडून तिचे डोके ओट्यावर आपटले आणि त्यानंतर विट डोक्यावर मारून तिची हत्या केली. ही बाब पोलिस तपासात पुढे आली आहे. याप्रकरणात पोलिसांनी आरोपी पतीला मध्यप्रदेशातून त्याच्या मुळ गावातून अटक केली, अशी माहिती पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत दिली.

पोलिस सुत्रानुसार, लक्ष्मण मानसिंग मरावी, (34, रा. ओहनी, जि. मंडला, मध्यप्रदेश) असे अटक आरोपी पतीचे नाव आहे. तर मृत महिलेची ओळख भागवती लक्ष्मण मरावी (38, रा. ओहनी) अशी झाली आहे. बडनेरा पोलिसांनी या प्रकरणात यापूर्वी शेखर उर्फ चंद्रशेखर नारायण चिंचोळकर (34, रा. इंदिरानगर झोपडपट्टी, बडनेरा) याला अटक केली होती.



### 47 ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले

पोलिसांनी बडनेरा रेल्वे स्थानकावर या घटनेबाबत चौकशी केल्यानंतर तेथील बॉटल विक्री करणार्या साहू नामक व्यक्तीने घडलेली घटना सांगितली होती. या माहितीच्या आधारे आरोपी शेखर चिंचोळकर याला अटक करून त्याची चौकशी केली असता, त्याने 14 ऑक्टोबर रोजी रात्री घडलेल्या घटनेबाबत माहिती दिली. परंतु, त्यानंतरही मृत महिलेची ओळख न पटल्याने गुन्हे शाखेच्या युनिट दोनने प्रयत्न सुरू केले. तब्बल 47 ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज, फोटो व अन्य माहितीच्या आधारावर गुन्हे शाखेच्या युनिट दोनला मृतक महिलेची ओळख पटविण्यात यश आले.

### असा घडला हत्येचा थरार

कामाच्या शोधात असणारे मरावी दाम्पत्य 14 ऑक्टोबर रोजी रेल्वे स्थानकाकडे निघाले. त्यावर मी तुम्हाला रेल्वे स्थानकावर सोडून देतो, असे शेखरने म्हटले. त्यानंतर तिघेही रेल्वे स्थानकावर पोहोचले. लक्ष्मणने गावी जाण्यासाठी गोंदियापर्यंतचे दोन तिकीट काढले. काही वेळाने शेखर दारू घेऊन आल्यावर तिघांनीही वाहनतळानजीक पाण्याच्या टाकीखाली मद्यप्राशन केले. लक्ष्मणला दारू चढल्याने तो तेथेच झोपला. दरम्यान, रात्री 10.30 वाजताच्या सुमारास वेळाने जाग आल्यावर लक्ष्मणला पत्नी आणि शेखर आक्षेपार्ह स्थितीत दिसले. लक्ष्मण शिव्या देत उठल्यावर शेखर तेथून पळून गेला. त्यानंतर लक्ष्मणने रागाच्या भरात भागवतीचे डोके ओट्यावर आपटले तसेच विटेने तिच्या डोक्यावर वार केले.

# दहा लाखांचा भेसळयुक्त खवा जप्त

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** सणासुदीच्या काळात लोकमत न्यूज नेटवर्क खाद्यपदार्थांमधील भेसळीचे प्रमाण वाढते. त्यामुळे अन्न व औषधी प्रशासन अधिक सतर्कतेने याकडे लक्ष ठेवून असते. या पार्श्वभूमीवर, दिवाळीच्या तोंडावर कर्नाटकातून अमरावतीत आलेला 3500 किलो भेसळयुक्त खवा ज्याची किंमत अंदाजे दहा लाख रुपये आहे. तो अन्न व औषधी प्रशासनाने छापा टाकून जप्त केला.

अन्न व औषधी प्रशासन या प्रकरणी कारवाई करत असून नागरिकांनी याबाबत सतर्कता बाळगावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. कर्नाटक व गुजरात राज्यांतून मोठ्या प्रमाणावर अवैध व भेसळयुक्त अन्नपदार्थ शहरात पोहोचल्याची माहिती अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे यांना मिळताच गुरुवारी अन्न व औषधी प्रशासनाने शहरातील जुना बायपास मार्गावरील भागातील चैतन्य कॉलनीतील दिनेश रामराव नागपुरे यांच्या गोदामावर छापा टाकून सहआयुक्त रामभाऊ चौव्हाण यांच्या मार्गदर्शनात कारवाई केली. यावेळी अन्न सुरक्षा अधिकारी संदीप सूर्यवंशी, जिल्हा दुग्ध विभागाचे विनोद पाठक, पशुधन विकास अधिकारी तुषार गावंडे, तसेच फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

# रोख वस्तू जप्तीबाबत जिल्हा तक्रार समिती गठीत

**अमरावती–** जिल्ह्यातील सर्व विधानसभा क्षेत्रात जप्त करण्यात आलेली रोख रक्कम किंवा मौल्यवान वस्तू संदर्भात नागरिकांचे म्हणणे ऐकून त्यावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तक्रार समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीस तक्रारी सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024ची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. त्यानुषंगाने निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त आणि पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी आयोगाने आदर्श आचार संहिता आखून दिली आहे. सदर निवडणूक काळात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याद्वारे नियुक्त पथकाकडून संशयास्पद रोख रक्कम व मौल्यवान वस्तू जप्त करण्यात येतात, कोणतीही रक्कम किंवा मौल्यवान वस्तू या प्रथम खबरी अहवाल, तक्रारीशिवाय कोषागार, मालखाण्यात ठेवण्यात येतात.

# कुख्यात शेख मुन्नु शेख सलीमवर एमपीडिएची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** शहरातील कुख्यात गुन्हेगार शेख मुन्नु शेख सलीम (34, रा. गवळीपुरा, अमरावती) याच्याविरुध्द एमपीडीए कायद्यान्वये कारवाई करून, त्याला वर्षभरासाठी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.



वर्षभरासाठी कारागृहात स्थानबध्द

शेख मुन्नु हा सन 2020 पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सक्रीय त्याच्याविरूध्द नागपुरी गेट, खोलापुरी गेट, बडनेरा, गाडगेनगर हद्दीत खुनाचा प्रयत्न करणे, गृह अतिक्रमण करणे, अपहरण प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होवुन दंगा करणे, पुरावा नष्ट करणे, कट रचने, अश्लील कृती करणे, शांतता भंग घडवुन आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, मृत्यु किंवा जबर दुखापत घडवुन आणण्याची धमकी, अग्णीशस्त्र बाळगणे, अवैध शस्त्र विक्री करणे, अधिसुचनांचे उल्लघंन करणे, हद्दपार आदेशाचे उल्लघंन करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण 11 गुन्हे दाखल आहे.

### विशेष गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रित

**अमरावती –** माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी विशेष कामगिरीसाठी विशेष गौरव पुरस्कार देण्यात येते. यासाठी दि. 25 ऑक्टोबरपर्यंत अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. माजी सैनिक, वीरपत्नी यांच्या पाल्यांना इयत्ता बारावीमध्ये 85 टक्के व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत आणि चालू वर्षात आयआयएम, आयआयटी, एआयआयएमएस, तसेच कोणत्याही क्षेत्रात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त पाल्यांचा गौरव करण्यात येणार आहे. सर्व माजी सैनिक पाल्य, माजी सैनिक, सैनिक वीरपत्नी यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातून अर्ज घेऊन दि. 25 ऑक्टोबर 2024 पर्यंत कागदपत्रासह जमा करावेत.

# जीतू दुधानेचा प्रहारमध्ये प्रवेश

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** आ. रवि राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचे मुख्य प्रवक्ते जीतु दुधाने यांनी आ. बच्चु कडू यांच्या प्रहार पक्षात प्रवेश घेतल्याची माहिती पुढे आल्याने अमरावती शहरात राजकारणात चांगलीच चर्चा रंगली आहे. आ. रवि राणा यांच्या विश्वासातील जीतु दुधाने हे युवा स्वाभिमान पार्टीशी जुळलेले होते. दोन दिवसांपूर्वी जीतू दुधाने यांनी युवा स्वाभिमान पक्षाला रामराम ठोकत आ. रवि राणा यांच्याकडे राजीनाम्याचे पत्र दिले होते. त्याच्या या निर्णयामागे काय कारण आहे, ही बाब पुढे आली नाही. परंतू आता जीतु दुधाने यांनी आ. बच्चु कडु यांच्या प्रहारमध्ये प्रवेश घेतल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणूक तोंडावर असताना, आ. रवि राणा यांना मोठा धक्का बसला आहे.

# आंतर विद्यापीठ कब्बडी (महिला) क्रीडा स्पर्धेत चार राज्यातील 74 विद्यापीठाच्या चमू होणार सहभागी

## डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या 125 व्या जयंतीवर्षानिमित्त आयोजन

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने दि.22 ऑक्टोबर ते 25 ऑक्टोबर2024 पर्यंत पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कब्बडी (महिला) क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान,गुजरात, मध्यप्रदेश राज्यातील 74 विद्यापीठाच्या चमू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा आस्वाद घेण्यासाठी अडीच हजार आसन क्षमतेचे प्रेक्षागृह उभारण्यात आले असून 4 मॅटग्राउंडवर एकाच वेळी चार सामने होतील.



अमरावतीत प्रथमच या स्पर्धांचे रात्रीच्या वेळी प्रचंड प्रकाशझोतात आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत उद्घाटनानंतर पहिल्या दिवशी 40 सामने खेळल्या जातील, अशी माहिती या स्पर्धेच्या आयोजन समितीचे कार्याध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी दिली. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना दिलीपबाबू इंगोले म्हणाले की, श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर आयोजित या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मंगळवार दि.22 ऑक्टोबरला सायंकाळी 6 वाजता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेत होणार असून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख या सोहळ्याचे उद्घाटन करतील.अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा, अमरावतीचे पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील तर कार्याध्यक्ष व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले प्रामुख्याने उपस्थित राहतील.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.रवींद्र कडू व डॉ.प्रवीण रघुवंशी, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर व ॲड.जे.व्ही.पाटील पुसदेकर, कार्यकारिणी सदस्य प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे व प्रा.सुभाष बनसोड व संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.वि.गो. ठाकरे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या आंतरविद्यापीठ महिला कब्बडी क्रीडा स्पर्धेत देवी अहिल्या विद्यापीठ, इंदोर, गुजरात विद्यापीठ, अहमदाबाद, विक्रम विद्यापीठ, उज्जेन, मारवाडी विद्यापीठ, राजकोट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर आदी विद्यापीठातील एकूण 74 विद्यापीठाच्या चमू सहभागी होणार आहेत. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दि.25 ऑक्टोबर 2024 ला रात्री 8 वाजता कुलगुरू डॉ.मिलिंद बारहाते यांच्या अध्यक्षतेत होईल.अमरावतीचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील.अमरावती महानगर पालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, प्र- कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष केशवराव मेतकर, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, स्वीकृत सदस्य नरेशचंद्र पाटील, डॉ.पुरुषोत्तम वायाळ व प्राचार्य डॉ.अमोल महल्ले या समारंभाला प्रामुख्याने उपस्थित राहतील.

स्पर्धेचे उद्घाटन ते पारितोषिक वितरण समारंभापर्यंत दररोज रंगारंग कार्यक्रम सादर करण्यात येतील. या स्पर्धेचे आयोजन अत्यंत भव्यदिव्य राहणार आहे. कब्बडी प्रेमी अमरावतीकरांसाठी ही मोठो पर्वणी असल्याने समस्त क्रीडाप्रेमी अमरावतीकरांनी या स्पर्धेचा लाभ घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली.पत्रकार परिषदेला क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ, संगाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रभारी संचालक डॉ.तनुजा राऊत, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, आयोजन समितीचे संयोजक डॉ.सुभाष गावंडे, प्रसिद्धी समिती संयोजक डॉ.कुमार बोबडे, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ.विलास नांदुरकर उपस्थित होते.

# सोन्याची अंगुठी, ब्रेसलेट घेऊन केला पोबारा पलायन

### अलंकार ज्वेलर्समधील भर दिवसाची घटना

### चोर सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 18 ) –** जयस्तंभ चौकातील अलंकार ज्वेलर्समध्ये ग्राहक बनून आलेल्या एका तरुणाने हातात अंगठ्या व ब्रेसलेट घालून पलायन केले. चोराने जवळपास 5 लाख 70 हजार रुपये किमतीचे 74 ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पोबारा केला आहे. ही धक्कादायक घटना 18 ऑक्टोबर रोजी दुपारी 1.45 वाजताच्या सुमारास सिटी कोतवाली ठाण्याच्या हद्दीतील जयस्तंभ चौक रोडवरील मालवीय चौक परिसरातील श्री अलंकार ज्वेलर्स आर्ट या प्रतिष्ठानात घडली. चोरटा सोन्याच्या दागिन्यांची विचारपूस करतानाच अचानक पळून गेल्याचे चित्रीकरण सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहे. या घटनेच्या माहितीवरून कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन चोरट्याचा शोध सुरु केला आहे.



जयस्तंभ मार्गावरील सहकार भवनजवळ नितीन पारेख (65, रा. कॅम्प) यांचे श्री अलंकार ज्वेलर्स आर्ट नामक ज्वेलरी प्रतिष्ठान आहे. शुक्रवारी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास सुटबुट व जॅकेट अशी वेषभुषेत असणारा एक तरुण ग्राहक बनून अलंकार ज्वेलर्समध्ये पोहोचला होता. त्याने अंगठी खरेदी करायची आहे, असे पारेख यांना सांगितले. त्यानंतर पारेख यांनी त्याला काही अंगठ्या दाखविल्या. त्यावेळी त्याने चार अंगठ्या आपल्या हाताच्या बोटात घातल्या. दरम्यान त्याने सोन्याचे ब्रेसलेट दाखविण्यास सांगितले. त्यानुसार पारेख यांनी त्याला काही ब्रेसलेट दाखविले. त्यातील एक ब्रेसलेट त्याने आपल्या हाताला बांधले. दरम्यानच थुंकण्याचा बहाणा करीत तो प्रतिष्ठानाबाहेर गेला आणि त्याने तेथून अचानक पलायन केले. ग्राहक बनून आलेला चोर अंगठ्या व ब्रेसलेट घेऊन पसार झाल्याचे लक्षात येताच पारेख यांनी तातडीने घटनेची माहिती कोतवाली पोलिसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. याबाबत माहिती मिळाल्यावर कोतवालीचे ठाणेदार मनोहर कोटनाके व गुन्हे शाखेच्या युनिट एकचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांनीही घटनास्थळ गाठून पाहणी केली. पोलिसांनी सीसीटीव्हीची तपासणी केली असता, त्यात चोर स्पष्टपणे दिसत आहे. त्यामुळे पोलिसांनी आरोपीचा शोध सुरु केला आहे.

# मनसे चे इंजिन ठरणार सायलेंट किलर?

### मविआ, महायुती गोळाबेरजेतच व्यस्त

### अमरावती मतदारसंघातील राजकारणाचे न्यारेच वारे





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.18 )–** पक्षाच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत 24 वर्षात पहिल्यांदा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून अमरावती विधानसभा मतदारसंघात खेळी खेळली जात आहे. जी प्रस्थापितांच्या पायाखालची वाळू सरकवायला भाग पाळत आहे. निवडणूक लढायची म्हणून लढायची, इतकाच विचार न करता जे काही करायचे ते 'ताल ठोकुन' करायचे अशी भुमिका असलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पहिल्यांदाच आपले 'इंजिन' अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या रुळावर उतरविले आहे. महापालिकेचे माजी सभापती मंगेश उर्फ पप्पु पाटील यांच्या रुपाने जिल्ह्यातील पाटील, देशमुख जातीय समीकरणात 'परफेक्ट' बसणारा व्यक्ती उमेदवार दिल्याने 'सायलेंट किलर' च्या भूमिकेत असलेले मनसेचे इंजिन कुणाला साधक आणि कुणाला बाधक ठरेल याची गोळाबेरीज मविआ, महायुतीकडून केली जात आहे. दुसरीकडे या सर्वांना आपण ओव्हरटेक करु या ऐठीत हे इंजिन पुढे धावत आहे.

इतर राजकिय पुढाऱ्यांचे विचार जेथे थांबतात तेथून राज ठाकरे यांची रणनिती सुरु होते. दोन वर्षांपुर्वी मनसे प्रमुख राज ठाकरे अमरावतीच्या दौऱ्यावर असताना त्यांनी विधानसभा निवडणूकीच्या आखणीमध्ये अमरावती मतदारसंघाचा समावेश केला होता. त्यामूळे शहर, जिल्ह्यातील कार्यकारिणीमध्ये तातडीने फेरबदल करत 'काम दाखवा आणि टीकून रहा'

हे धोरण ठेवले. ज्याचा परिपाक मनसेने जिल्ह्यात एक मजबूत पकड निर्माण केली. विशेषत: कधीकाळी मोजके पदाधिकारी असलेल्या मनसे च्या आज अमरावती शहरात विविध आघाड्या कार्यशील आहे. आता पक्षाची बांधणी मजबूत आहे, असा विश्वास निर्माण झाल्यावरच राज ठाकरेंनी अमरावती विधानसभा मतदारसंघात पप्पु पाटील यांना उमेदवारी घोषीत केली. आजी-माजी आमदारांच्या मुंबई वाऱ्या सुरु असताना पप्पु पाटील यांनी नियोजनबध्दरित्या प्रचाराचा नारळ फोडला आणि दिग्गजांसमोर आपले आव्हान उभे केले.

महाविकास आघाडी आणि महायुतीचा बंडखोरांशी झुंजण्यात बराच वेळ निघून जाईल, असे दिसत असताना मनसे चे इंजिन मात्र या संधीचे सोने करित अनेक दूरपर्यंत मजल मारेल यात दुमत नसावे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

